पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ३

**सभावृत्तांत**

दिनांक – **०८/०६/२०१८** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **०८/०६/२०१८** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकात

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

सभा कामकाज सुरु करतेवेळी आवश्यक गणसंख्या सभागृहात उपस्थित नसल्याने उपस्थित सन्मा.सदस्य यांनी शुक्रवार दिनांक २२/०६/२०१८ रोजी दुपारी २.४५ वाजेपर्यंत सभा तहकूब केली.

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ३

**सभावृत्तांत**

**(** दिनांक ०८/०६/२०१८ ची तहकूब सभा **)**

दिनांक – **२२/०६/२०१८** वेळ - दुपारी **२.४५** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची दिनांक ०८/०६/२०१८ ची तहकूब सभा शुक्रवार दिनांक **२२/०६/२०१८** रोजी दुपारी **२.४५** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.संजय बबन नेवाळे - सभापती
२. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
३. मा.अपर्णा निलेश डोके
४. मा.संजय मल्हारराव वाबळे
५. मा.अश्विनी विक्रम वाघमारे

या शिवाय मा.शेख – उपनगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.संजय वाबळे

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची दिनांक २२/०६/२०१८ (दु.२.४५ वा.) ची तहकूब सभा सोमवार दिनांक २५/०६/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**सभापती** - सोमवार दिनांक २५/०६/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

( **संजय बबन नेवाळे** )
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य
व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ३

**सभावृत्तांत**

**(** दिनांक ०८/०६/२०१८ व २२/०६/२०१८ (दु.२.४५ वा.) ची तहकूब सभा **)**

दिनांक – **२५/०६/२०१८** वेळ - दुपारी **२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची दिनांक २२/०६/२०१८ (दु.२.४५ वा.) ची तहकूब सभा सोमवार दिनांक **२५/०६/२०१८** रोजी दुपारी **२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.संजय बबन नेवाळे - सभापती
२. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
३. मा.सुजाता सुनिल पालांडे
४. मा.अपर्णा निलेश डोके
५. मा.संजय मल्हारराव वाबळे
६. मा.अश्विनी विक्रम वाघमारे
७. मा.कुंदन अंबादास गायकवाड

या शिवाय मा.चितळे – सहाय्यक आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

दिनांक २५/०५/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.०२) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – ०९ विषय क्रमांक – ०१
दिनांक – २५/०६/२०१८ विभाग – क्रीडा
सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.अपर्णा डोके
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/३४९/२०१८, दि.०७/०५/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

म.न.पा.चे प्रस्तावात नमुद एकूण १२ जलतरण तलाव ( भोसरी तलाव वगळता ) पाणी शुद्धिकरण, परिसर स्वच्छता, साफसफाई देखभाल व यांत्रिक देखभाल दुरूस्ती कामकाजाची मुदत दि.३१/१२/२०१७ रोजी संपल्याने व सदर कामाची ई-निविदा प्रक्रिया कार्यवाही चालू असल्याने एकूण १२ जलतरण तलावाचे कामाची मुदत दि.०१/०१/२०१८ ते ई निविदा प्रक्रिया पुर्ण होई पर्यंत मे.वरदायिनी एन्टरप्रायजेस, चिंचवड, पुणे १९ यांना १० जलतरण तलाव व मे.सुमित स्पोर्टस अँड

फिटनेस इक्विपमेंट चिंचवड, पुणे १९ यांना २ जलतरण तलाव पाणी शुद्धिकरण, परिसर स्वच्छता, साफसफाई देखभाल व यांत्रिक देखभाल दुरूस्ती कामकाज मुदतवाढ देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १० | विषय क्रमांक – ०२

दिनांक – २५/०६/२०१८ | विभाग – क्रीडा

सुचक – मा.कुंदन गायकवाड | अनुमोदक – मा.संजय वाबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७/कावि/४२२/२०१८, दि.०८/०५/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

क्रीडा धोरणात एशियन क्रीडा स्पर्धेत सुवर्ण पदक विजेत्या खेळाडूस २,००,०००/- आर्थिक सहाय्य अदा करणेचे धोरण आहे. कु.श्रेया शंकर कंधारे, निगडी, पुणे ४४ हीने ७ वी एशियन योगा स्पोर्टस चॅम्पियनशीप २०१७ सिंगापूर येथे झालेल्या स्पर्धेत सुवर्ण पदक प्राप्त केल्यामुळे तिला र.रू.२,००,०००/- (अक्षरी र.रु.दोन लाख फक्त) आर्थिक सहाय्य अदा करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ११ | विषय क्रमांक – ०३

दिनांक – २५/०६/२०१८ | विभाग – क्रीडा

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे | अनुमोदक – मा.अपर्णा डोके

संदर्भ – मा.सहाय्यक आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/४/कावि/१४९/२०१८, दि.०९/०५/२०१८

मा.सहाय्यक आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने, हॉकी महाराष्ट्र यांच्या मान्यतेने व डॉ.बाबासाहेब आंबेडकर मेमोरियल हॉकी टूर्नामेंट कमिटी, पुणे यांच्या सहकार्याने महापौर चषक राज्यस्तरीय हॉकी स्पर्धा २०१८ चे आयोजन माहे मे/जून २०१८ मध्ये म.न.पा.च्या मेजर ध्यानचंद पॉलीग्रास हॉकी स्टेडीयम, नेहरूनगर येथे आयोजित करणेस व त्याकामी हॉकी महाराष्ट्र यांनी र.रू.११,९६,९००/- चे अंदाजपत्रकात मागणी केले पैकी म.न.पा. क्रीडा धोरणानुसार हॉकी महाराष्ट्र यांचे नावे करारनामा करून स्पर्धा खर्च र.रू १०,००,०००/- (अक्षरी र.रु.दहा लाख फक्त) अदा करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **संजय बबन नेवाळे** )
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य
व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/३८३/२०१८
दिनांक : २८/०६/२०१८



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

Z:\e drive\Nagersachiv1\New Folder\Ele 17 sub committee sabhapati.doc